देशोन्नती



■ डॉ. मिलिंद कांबळे यांचे प्रतिपादन

■ विद्या विकास महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रम

# महामानवांचे चरित्र वाचनाने माणूस घडतो

देशोन्नती वृत्तसंकलन

**समुद्रपूर :** विद्यार्थी मित्रांनो ,समाजमन घडवण्यासाठी जगातील उत्तम ग्रंथ वाचल्यानंतरच समाज घडत असतो, जीवनाच्या सुखदुःखामध्ये आपल्याला पुस्तके मार्गदर्शन करत असतात म्हणून या जागतिकीकरणाच्या काळामध्ये आपण जास्तीत जास्त पुस्तके वाचली पाहिजेत तरच आपला आणि आपल्या राष्ट्राचा विकास होऊ शकतो पण विद्यार्थी मित्रांनो, आज या धकाधकीच्या जीवनामध्ये तरुणाई आणि आजचा शिकलेला माणूस ग्रंथापासून दूर जात आहे. यामुळे महाराष्ट्रातील वाचन संस्कृती येणाऱ्या पाच दहा वर्षात संपेल की काय अशी भीती निर्माण झालेली आहे.

कुठलीही संस्कृती आणि कुठलीही भाषा जिवंत राहण्यासाठी वाचन संस्कृती खूप महत्त्वाची आहे . मोबाईलच्या काळामध्ये आजची तरुणाई आणि आजचा माणूस ग्रंथापासून दूर जात आहे ही खूप गंभीर बाब आहे. म्हणून चांगला सुदृढ समाज घडवण्यासाठी, संस्कारी समाज घडवण्यासाठी महामानवांची चरित्र आपण वाचली पाहिजे , असे प्रतिपादन डॉ. मिलिंद कांबळे यांनी केले . स्थानिक विद्या विकास महाविद्यालयात ग्रंथालय विभागातर्फे तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंग्रजी विभाग प्रमुख व भाषा साहित्याचे अभ्यासक डॉ. राजेशम वेलुपुल्ला होते. मुख्य वक्ते म्हणून विद्या विकास महाविद्यालयातील डॉ. मिलिंद कांबळे, मराठी विभाग प्रमुख उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभागाच्या प्रा. स्मिता काळे , ग्रंथपाल डॉ. प्रमोद आलोने , राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. प्रकाश तळे उपस्थित होते. कार्यकमाचे अध्यक्ष डॉ. राजेशम वेलुपुल्ला यांनी वाचन संस्कृतीवर आणि आजचा विद्यार्थी यावर मार्गदर्शन केले. प्राध्यापिका स्मिता काळे यांनी आजचा विद्यार्थी कसा वाचन संस्कृती पासून दूर गेला ,मोबाईलमुळे विद्यार्थी वाचन संस्कृती पासून कसा दूर जात आहे आणि या मोबाईल संस्कृतीने वाचन संस्कृती कशी नष्ट केली यावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. प्रमोद आलोने यांनी केले. संचालन डॉ. प्रकाश तळे यांनी केले. आभार प्रदीप कापकर यांनी मानले. कार्यक्रमाला ग्रंथालयातील कर्मचारी सुरेश शेळकर, प्रतिभा यांनी सहकार्य केले. तनू कुमरे . तनू मडावी ,पायल झुकनाके, प्राची भोयर ,आरती ठाकरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. तालुका प्रतिनिधी

## तरुण पिढी वाचन संस्कृतीपासून दूर जात आहे

आज महाराष्ट्रात वाचन संस्कृती नष्ट होत आहे. ग्रंथालयामधील ग्रंथ धुळखात पडलेले आहेत. तरुण पिढी ही मोबाईलच्या नादाला लागून वाचन संस्कृतीपासून दुर जात आहे ,ही वाचन संस्कृतीला भेडसावणारी खूप मोठी समस्या आहे.

वाचन संस्कृती टिकवण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी तरुणांमध्ये वाचन संस्कृती कशा पद्धतीने रूढ करता येईल यावर विचार मंथन झाले पाहिजे, तरुणांना पुस्तकांचे वेड लावले पाहिजे तरच वाचन संकृती टिकेल असे विचार डॉ. मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले.

Wardha Edition
Jan 10, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

AnyScanner

देशोन्नती
– वर्धा | शुक्रवार | दि. १० जानेवारी २०२५
www.deshonnati.wardha@



- डॉ. मिलिंद कांबळे यांचे प्रतिपादन
- विद्या विकास महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रम

# महामानवांचे चरित्र वाचनाने माणूस घडतो

देशोन्नती वृत्तसंकलन

**समुद्रपूर :** विद्यार्थी मित्रांनो ,समाजमन घडवण्यासाठी जगातील उत्तम ग्रंथ वाचल्यानंतरच समाज घडत असतो, जीवनाच्या सुखदु:खामध्ये आपल्याला पुस्तके मार्गदर्शन करत असतात म्हणून या जागतिकीकरणाच्या काळामध्ये आपण जास्तीत जास्त पुस्तके वाचली पाहिजेत तरच आपला आणि आपल्या राष्ट्राचा विकास होऊ शकतो पण विद्यार्थी मित्रांनो, आज या धकाधकीच्या जीवनामध्ये तरुणाई आणि आजचा शिकलेला माणूस ग्रंथापासून दूर जात आहे. यामुळे महाराष्ट्रातील वाचन संस्कृती येणाऱ्या पाच दहा वर्षात संपेल की काय अशी भीती निर्माण झालेली आहे.

कुठलीही संस्कृती आणि कुठलीही भाषा जिवंत राहण्यासाठी वाचन संस्कृती खूप महत्त्वाची आहे . मोबाईलच्या काळामध्ये आजची तरुणाई आणि आजचा माणूस ग्रंथापासून दूर जात आहे ही खूप गंभीर बाब आहे. म्हणून चांगला सुदृढ समाज घडवण्यासाठी, संस्कारी समाज घडवण्यासाठी महामानवांची चरित्र आपण वाचली पाहिजे , असे प्रतिपादन डॉ. मिलिंद कांबळे यांनी केले . स्थानिक विद्या विकास महाविद्यालयात ग्रंथालय विभागातर्फे तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंग्रजी विभाग प्रमुख व भाषा साहित्याचे अभ्यासक डॉ. राजेशम वेलुपुल्ला होते. मुख्य वक्ते म्हणून विद्या विकास महाविद्यालयातील डॉ. मिलिंद कांबळे, मराठी विभाग प्रमुख उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभागाच्या प्रा. स्मिता काळे , ग्रंथपाल डॉ. प्रमोद आलोने , राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. प्रकाश तळे उपस्थित होते. कार्यकमाचे अध्यक्ष डॉ. राजेशम वेलुपुल्ला यांनी वाचन संस्कृतीवर आणि आजचा विद्यार्थी यावर मार्गदर्शन केले. प्राध्यापिका स्मिता काळे यांनी आजचा विद्यार्थी कसा वाचन संस्कृती पासून दूर गेला ,मोबाईलमुळे विद्यार्थी वाचन संस्कृती पासून कसा दूर जात आहे आणि या मोबाईल संस्कृतीने वाचन संस्कृती कशी नष्ट केली यावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. प्रमोद आलोने यांनी केले. संचालन डॉ. प्रकाश तळे यांनी केले. आभार प्रदीप कापकर यांनी मानले. कार्यक्रमाला ग्रंथालयातील कर्मचारी सुरेश शेलकर, प्रतिभा यांनी सहकार्य केले. तनू कुमरे , तनू मडावी ,पायल झुकनाके, प्राची भोयर ,आरती ठाकरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. **तालुका प्रतिनिधी**

## तरुण पिढी वाचन संस्कृतीपासून दूर जात आहे

आज महाराष्ट्रात वाचन संस्कृती नष्ट होत आहे. ग्रंथालयामधील ग्रंथ धुळखात पडलेले आहेत. तरुण पिढी ही मोबाईलच्या नादाला लागून वाचन संस्कृतीपासून दूर जात आहे ,ही वाचन संस्कृतीला भेडसावणारी खूप मोठी समस्या आहे.

वाचन संस्कृती टिकवण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी तरुणांमध्ये वाचन संस्कृती कशा पद्धतीने रूढ करता येईल यावर विचार मंथन झाले पाहिजे. तरुणांना पुस्तकांचे वेड लावले पाहिजे तरच वाचन संस्कृती टिकेल असे विचार डॉ. मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले.